**MHGO060009022022**

**म. कौ. हिं. का.अर्ज क्र– २३/२०२२**
श्यामली + २ वि. विनय + ५

**आदेश नि. क्र. २ खाली**
**(आदेश पारीत दिनांक ०२.०८.२०२३)**

अर्जदाराने सदरचा अर्ज अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदार क्र. १ ने अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचे सन २००८ चे मार्च महीन्यामध्ये समाजातील जाती रितीरिवाजाप्रमाणे मौजा दिनकरनगर येथे विवाह झालेला असून लग्नात मिळालेल्या संपुर्ण आंदणासह मौजा दुर्गापुर जि. कानकेर (छत्तीसगढ) येथे गैरअर्जदार क्र. १ च्या मुळ गावी नांदायला गेली. या लग्नसंबंधातून दोन मुले नामे कु. झरणा व धनराज ही झालेली आहेत. सासरी नांदायला गेल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ ला जवळपास सहा महीन्यापर्यंत चांगली वागणूक दिली व त्यानंतर त्याने अर्जदार क्र. १ ला 'अपने बाबा के यहा से मोटारसायकल खरीदने के लिए ७०,०००/– रुपये लेकर आ' असे बोलून अर्जदार क्र. १ ला मारझोड करणे सुरु केले. त्यावेळी अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ याला माहेरची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे ते तुमच्या मागणीची पुर्तता करु शकत नाही अशाप्रकारे त्यांना समजाविले परंतु गैरअर्जदार क्र. १ याचे अर्जदार क्र. १ ला शारीरीक व मानसिक त्रास देणे सुरुच होते. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ च्या वागणुकीबाबत आपल्या वडीलांना सांगितल्यानंतर अर्जदार क्र. १ च्या वडीलांनी घरातील सोन्या चांदीचे दागिने गहाण ठेवून ६०,०००/– रुपये नगदी स्वरुपात दिलेले आहेत.

३) अर्जदार क्र. १ ने पुढे असेही कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही गर्भवती असतांनी सुध्दा गैरअर्जदार क्र. १, ३ व ४ हे घरगुती शुल्लक कारणावरुन अर्जदार क्र. १ सोबत विनाकारण भांडण उपस्थित करायचे व त्यावेळी गैरअर्जदार क्र. ४ ते ६ हे गैरअर्जदार क्र. १ ला अर्जदार क्र. १ ला मारहाण करण्याकरीता प्रोत्साहन करीत होते. अर्जदार क्र. १ ला दिनांक २५.११.२००९ रोजी पहीली मुलगी नामे झरणा झाल्यानंतर सुध्दा वरील सर्व गैरअर्जदार अर्जदार क्र. १ चा फार शारीरीक व मानसिक छळ करायचे.लहान मुलगी झरणा ही आठ महीन्याची झाल्यानंतर अर्जदार क्र. १ गैरअर्जदारांचा त्रास सहन न झाल्यामुळे ती लहान मुलीला सोबत घेवून एकटीच आपल्या माहेरी मौजा दिनकरनगर येथे रहायला आली अर्जदार क्र. १ ही जवळपास तीन महीन्यापर्यंत आपल्या माहेरी राहील्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा तिला न्यायला आला होता. त्यावेळी त्याने अर्जदार क्र. १ व तिचे आई वडीलांना चांगले वागण्याबाबतचे तोंडी आश्वासन देवून अर्जदार क्र. १ ला आपल्या सोबत नांदायला घेवून गेला. तिथे गेल्यानंतर जवळपास एक महीन्यानंतर गैरअर्जदाराचे संपुर्ण कुटुंब मौजा वांगेतुरी ता. ऐटापल्ली जि. गडचिरोली येथे कायम स्वरुपी राहायला गेले परंतु तिथे गेल्यानंतर सुध्दा गैरअर्जदारांचे अर्जदार क्र. १ ला शारीरीक व मानसिक त्रास देण्याचे प्रमाण कमी झाले नाही.

४) अर्जदार क्र. १ ने पुढे असेही कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार हे वांगेतुरी येथे राहायला आल्यानंतर जवळपास एक वर्षाने गैरअर्जदार क्र. १ यांचे विवाह बाहय संबंध तयार झाले. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ वर विनाकारण संशय घेवून तिला बेदमपणे मारझोड करुन घराबाहेर हाकलत होता. शेवटी अर्जदार क्र. १ ला गैरअर्जदारांचा त्रास सहन न झाल्यामुळे ती तिच्या दोन्ही मुलांना सोबत घेवून आपल्या माहेरी परत आली.

५) अर्जदार क्र. १ ने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही आपल्या

माहेरी आल्यानंतर सुध्दा ती अनेकदा गैरअर्जदार क्र. १ कडे नांदण्याकरीता गेली. अर्जदार हे वांगेतुरी येथे गेल्यानंतर सर्व गैरअर्जदार एकत्र राहायचे व दोन दिवस चांगले राहून पुन्हा सर्व मिळून अर्जदार क्र. १ चा छळ करायचे. त्यामुळे मागील सात महीन्यापासून अर्जदार हे गैरअर्जदाराकडे पुन्हा राहायला गेली नाही व ती सध्या आपल्या वडीलांच्या आश्रयावर मौजा दिनकरनगर येथे राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ यांचे मौजा वांगेतुरी येथे मोठे मकान असून त्याचे स्वतःच्या मालकीचे किराणा दुकान व मोटारसायकल रिपेरिंग सेंटर आहे त्यातून गैरअर्जदार क्र. १ याला जवळपास ५० ते ६० हजार रुपये प्रतिमहीना कमाई होत असते तसेच त्याचे मौजा दुर्गापरू ९७ येथे जवळपास दहा एकर मक्याची शेती व दोन एकर धानाची शेती असून त्यातून वर्षाकाठी १० ते १५ लाख रुपयांचे उत्पन्न होते. गैरअर्जदार क्र. ३ हा भाजीपाला विक्रीचे व्यवसाय करीत असून तो दर दिवशी ७०० ते ८०० रुपये कमवित असतो. गैरअर्जदाराने आजपर्यंत अर्जदारांना कोणतीही आर्थिक मदत केली नसल्यामुळे, अर्जदार क्र. १ ते ३ यांना रु. २०,०००/- दरमहा अंतरीम पोटगीची रक्कमेची मागणी केलेली आहे.

६) गैरअर्जदाराने त्याचे उत्तर निशाणी क्र.११ वर दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र. १ चे अर्जदार क्र. १ सोबत सन २००८ मध्ये लग्न झाले. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही तीन वर्ष कशीतरी गैरअर्जदार क्र. १ यांचेकडे नांदली परंतु त्या कालावधीत अर्जदार क्र. १ ही चारित्र संपन्न व्यक्ती नव्हती व तिने गावातील अनेक व्यक्तीसोबत अनैसर्गिक चाळे करणे सुरु केले. त्यावेळी गैरअर्जदार यांनी तिला त्याबद्दल हटकले तर तिने मला इथे राहायचे नाही, मी तुझ्याकडे बंदीस्त रहू शकत नाही म्हणून गैरअर्जदार यांचेकडे सोडचिठ्ठीची मागणी केली. त्यानंतर गावातील पंच कमेटी बोलविण्यात आली व त्या पंचकमेटीमध्ये अर्जदार क्र. १ हिने जातीरिवाजी व प्रचलित रुढीप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ ला पंचासमक्ष सोडचिठ्ठी दिली व आपला पोटगीचा एकमुक्त खर्च म्हणून गैरअर्जदार यांच्याकडून दोन लाख रुपये घेवून ती

माहेरी आली. तेव्हापासून ती आपल्या माहेरी राहत आहे व तेव्हापासून अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचा कोणताही संबंध नाही.

७) गैरअर्जदार क्र. १ ने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही सन २०1२ पासून आजपर्यंत मागील दहा वर्षापासून आपल्या माहेरी गैरअर्जदार क्र. १ ला जातीरिवाजाप्रमाणे व रुढीपरंपराप्रमाणे सोडचिठ्ठी देवून स्वखुषीने राहत आहे परंतु अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदाराला दहा वर्षानंतर त्रास देण्यासाठी सदर केस दाखल केलेली आहे. तिच्यावर गैरअर्जदार यांनी कोणताही कौटुंबिक हिंसाचारासारखा कोणताही अन्याय केलेला नाही. अर्जदार क्र. १ ही आपल्या वडीलांच्या घरी मौजा दिनकरनगर येथे स्वमर्जीने राहत आहे व त्या ठिकाणी ती स्वतःचा अवैध दारु व्यवसाय करीत असते व त्या अनुषंगाने गुन्हे सुध्दा दाखल झालेले आहेत. अर्जदार क्र. १ चे गैरअर्जदार क्र. १ च्या आत्याचा मुलगा गणेश मंडल मौजा आग्रा याच्यासोबत मागील दोन वर्षा अगोदर लग्न सुध्दा झालेले आहे व ती त्या ठिकाणी जावून सुध्दा राहत असते परंतु तिने गैरअर्जदार क्र. १ कडून पैसे वसूल करण्याच्या अनुषंगाने सदर खोटी केस दाखल केलेली आहे. करिता, गैरअर्जदाराने सदर अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

८) अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांवरुन खालील मुद्दे उपस्थीत झालेले आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | होय. |
| २. | अर्जदार क्र. १ ते ३ हे अंतरीम | होय, गैरअर्जदार क्र. १ कडुन |

| | | |
|---|---|---|
| | पोटगी मिळण्यास पात्र आहेत का ? असल्यास किती ? | अर्जदार क्र. १ ही रक्कम रुपये १०००/- व अर्जदार क्र. २ व अर्जदार क्र. ३ हे रक्कम रुपये ५००/- प्रत्येकी प्रतीमहा अंतरीम पोटगी म्हणुन मिळण्यास पात्र आहे. |
| ३. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>**

९) अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराची पत्नी व अर्जदार क्र. २ ही मुलगी व ३ हा त्याचा मुलगा आहे. अर्जदार क्र. १ हीने अर्जात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार हा तिला नेहमीच त्रास देत असतो. गैरअर्जदार अर्जदार क्र. १ चा फार शारीरीक व मानसिक छळ करायचे. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ वर विनाकारण संशय घेणे सुरु केले व त्या कारणांवरुन तिला तो बेदमपणे मारझोड करुन घराबाहेर हाकलत होता. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील नातेसंबंध लक्षात घेता त्यांच्यामध्ये 'कौटुंबिक नातेसंबंध' असल्याचे दिसते. अभिलेखावरुन अर्जदार कलम २ (अ) प्रमाणे 'पिडीत महीला' असल्याचे दिसते. तसेच गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ला मानसिक व शारिरीक त्रास देवून कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>**

१०) अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ यांचे मौजा वांगेतुरी येथे मोठे मकान असून त्याचे स्वतःच्या मालकीचे किराणा दुकान व मोटारसायकल रिपेरिंग सेंटर आहे त्यातून गैरअर्जदार क्र. १ याला जवळपास ५० ते ६० हजार रुपये प्रतिमहीना कमाई होत असते तसेच त्याचे मौजा दुर्गापुर ९७ येथे जवळपास दहा एकर मक्याची शेती व दोन एकर धानाची शेती असून त्यातून वर्षाकाठी १० ते

१५ लाख रुपयांचे उत्पन्न होते. तसेच गैरअर्जदाराच्या कुटुंबातील सर्व व्यक्ती कमावते असून कुणाचीही कुणावर पालन पोषणाची जबाबदारी नाही म्हणून अर्जदाराने रु. २०,०००/– दरमहा अंतरीम पोटगीची रक्कमेची मागणी केलेली आहे. याउलट गैरअर्जदार याने असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही दारुच्या अवैद्य व्यवसायातून पैसे कमविते.

११) वरील चर्चेनुसार असे निष्पन्न होते की, अर्जदार ही तिच्या मुलांसह तिचे वडिलांकडे राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ वेगळे राहत आहे. तसेच अर्जदार क्र. १ ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार क्र. १ वर पती म्हणून अर्जदार क्र. १ ची व पिता म्हणून अर्जदार क्र. २ व ३ यांना सांभाळण्याची कायदेशीर तसेच नैतीक जबाबदारी आहे. परंतु अर्जदार क्र. १ माहेरी गेल्यापासून गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तरतुद केलेली नाही. याठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा शारिरीकदृष्टया सुदृढ आहे. म्हणून माझ्या मते गैरअर्जदार क्र. १ ची अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची रककम पुरविण्याची ऐपत आहे व अर्जदार ही उदरनिर्वाह खर्च मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती, सद्ययाची महागाई, अर्जदाराची सामाजिक व राहती परिस्थिती, दैनंदिन खर्चाकरीता अर्जदाराला लागणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेता अर्जदार क्र. १ ला रु. १०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना रु. ५००/– प्रत्येकी प्रतिमाह अंतरिम पोटगी मंजुर करणे उचीत व न्यायोचीत ठरेल. वरील सर्व बाबींचा विचार करता मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>**

१२) अर्जदाराने तिचे हक्क प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. अर्जदाराची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता खालील अंतरिम आदेश पारीत करणे संयुक्तीक ठरते. मुद्दा क्र. ३ च्या उत्तराप्रित्यर्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१] अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२] गैरअर्जदार क्र. १ यास आदेशीत करण्यात येते की, अर्जदार क्र. १ हिला अंतरीम पोटगी रु.१०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना अंतरीम पोटगी रु.५००/– प्रत्येकी प्रतिमहा सदर अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून ते मुळ अर्जाच्या निकालापर्यंत देण्यात यावी.

३] सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनाशुल्क देण्यात यावी.

स्वा/–
(एन. व्ही. साहू)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
अर्जुनी/मोरगांव

दि. ०२.०८.२०२३